आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंतरराष्ट्रीय महिला दिन विविध कार्यक्रमांनी साजरा /देशात महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहीला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा प्रारंभ

- केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन या उपक्रमात महाराष्ट्र देशात अव्वल असल्याची केंद्रीय मंत्र्यांची प्रशस्ती

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकासाठी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम लढत /नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा न्यूझीलंडचा निर्णय

**<><><><><>**

जागतिक महिला दिन आज साजरा करण्यात आला. या दिनाची यंदाची संकल्पना “सर्व महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती” अशी आहे. जागतिक स्तरावर महिला अधिकारांचं बळकटीकरण,न्याय सुनिश्चितीकरण आणि लिंगसमभावाच्या दिशेनं वेगवान वाटचालीची आवश्यकता यावर भर देण्यात येत आहे.

महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महिला या समाजाच्या आधारस्तंभ असून जर महिला सुशिक्षित, स्वावलंबी आणि सक्षम असतील तर त्या देशाला समृद्ध आणि प्रगतिशील बनवण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

- - -.. **होल्ड- बाईट- राष्ट्रपती - - -**

महिलांच्या आंतरिक शक्तीमुळे आणि धडाडीच्या वृत्तीमुळे त्यांच्या कुटुंबांचं, समाजाचं आणि देशाचं भवितव्य घडत असल्याचं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

देशाच्या नारीशक्तीच्या कामगिरीचा देशाला अभिमान असून देशाच्या प्रगतीत त्यांच्या परिवर्तनकारी भूमिकेचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

देशात महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहीला जात असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं सुमारे साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी केल्यानंतर ते बोलत होते. देशातली नारी शक्ती नव्या जोमाने पुढे जात असून राष्ट्रनिर्माणात भरीव योगदान देत आहे, असं ते म्हणाले. महिलांसाठी केंद्र सरकारने सुरु केलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा उल्लेख त्यांनी केला. लखपती दीदी योजनेचं उद्दिष्ट दुप्पट करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं...

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

दिल्लीच्या सरोजिनीनगर परिसरात बांधलेल्या जीपीआरए वसाहतीला भेट देऊन आज प्रधानमंत्री मोदी यांनी महिला अर्जदारांना त्यांच्या सदनिकेच्या किल्ल्या सुपूर्द केल्या. महिला दिनानिमित्त प्रधानमंत्र्यांनी आज विविध योजनांच्या लाभार्थी महिलांशी संवाद साधला.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यभरात आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**भाईंदर**जवळ उत्तनच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत महिला लोकप्रतिनिधींसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज त्याचं उद्घाटन केलं. त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना त्यांनी सांगितलं….

**...होल्ड- बाईट- मुख्यमंत्री- - -**

**मुंबई** मेट्रो रेल्वे महामंडळानं आज एक विशेष उपक्रम राबवला आहे. मुंबई मेट्रो अॅक्वा लाईन वरची मरोळ नाका आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही दोन महत्त्वपूर्ण

मेट्रो स्थानकं आज पूर्णपणे महिला कर्मचारी चालवत आहेत. या कामात वेगवेगळ्या पाळ्यांमधल्या एकूण ८५ महिला कर्मचारी कार्यरत आहेत.

**नवी मुंबईत** महिला मिनी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली. विविध वयोगटातील तेराशेहून अधिक महिला यामध्ये सहभागी झाल्या होत्या.

**सांगली** जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी राबवलेल्या कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते यलो बेल्ट प्रमाणपत्रं प्रदान करण्यात आली.

**छत्रपती संभाजी नगर** इथं आज केंद्रीय युवा  व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महिलांसाठी विशेष अस्मिता लीग स्पर्धांचं उद्घाटन झालं. महिलांसाठी वॉकेथॉन आणि सायकल स्पर्धानाही त्यांनी  हिरवा झेंडा दाखवला. जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी महिलांची दुचाकी फेरी काढण्यात आली.

**धुळे आणि यवतमाळ** मध्येही अस्मिता महिला लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**धुळे** जिल्ह्यातल्या कर्तृत्ववान महिलांचा आज आदर्श महिला पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

**बीड**मधल्या आयोजित ‘महिला मॅरेथॉन’ स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.

**तुळजापूर** इथं श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान आणि आरोग्य विभागानं महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेतलं.

**गोंदिया** जिल्ह्यात आज पारंपरिक नऊवारी साड्या नेसून महिलांनी सायकल फेरी काढली. महिलांची बाईक फेरीही आयोजित केली होती.

**रत्नागिरी** तालुक्यातल्या कोतवडे इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आज मिरवणे धनगरवाडी परिसरातल्या महिला कामगारांची आरोग्य तपासणी केली. यावेळी आवश्यक औषधं,  पौष्टिक खाऊचे वाटप करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातल्या मुलींसाठी 'राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण' मोहिमेला आज प्रारंभ झाला. गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरच्या या लशीचा लाभ राज्यातल्या ९ लाख ८४ हजार ४१४ मुलींना मिळणार असून लसीकरण पूर्णपणे मोफत, ऐच्छिक, आणि पालकांच्या संमतीनं होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रं, ग्रामीण रुग्णालयं, जिल्हा रुग्णालयं, महानगरपालिका रुग्णालयं आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण केलं जाईल. सर्व लाभार्थ्यांची नोंदणी आणि प्रमाणपत्र वितरण केंद्र शासनाच्या U-WIN या डिजिटल पोर्टलद्वारे केलं जाणार आहे.

जिल्हास्तरावर ही मोहीम आजपासून सुरु झाली. नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुक्यातील मुगट आरोग्य केंद्रात 'एचपीव्ही' (HPV) लसीकरण मोहिमेचं उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या हस्ते झालं. यावेळी १४ ते १५ वयोगटातील किशोरवयीन मुलींना लस देऊन मोहिमेचा प्रत्यक्ष प्रारंभ करण्यात आला. जिल्ह्यातल्या २७ हजार मुलींना लस देण्याचं उद्दिष्ट आहे. गडचिरोलीत जिल्हा शल्यचिकित्सकांच्या हस्ते मोहिम सुरु झाली.

लातूर जिल्ह्यात वीस हजार ६७१ मुलींना ही लस मोफत देण्यात येणार आहे.

<><><><><>

केंद्र सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशन या उपक्रमात राज्य देशात अव्वल असल्याचं केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाचे राज्यमंत्री व्ही. सोमान्ना म्हणाले. ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत आणि मजबूत करण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढवण्याच्या उद्देशानं सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८ ते २२ मार्च दरम्यान जल महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. उपक्रमासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याला मिळणारा ४०६ कोटी रुपयांचा निधी लवकरच पूर्ण स्वरूपात दिला जाईल. तसंच, येत्या सहा महिन्यात राज्यातल्या सर्व घरांमध्ये नळाद्वारे पिण्याचं पाणी पोहोचवण्याचं काम होईल, तशा सूचना आपण अधिकाऱ्यांना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्या सुरु होत असून तो येत्या २ एप्रिल पर्यंत चालेल. लोकसभेत उद्या सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास प्रस्ताव मांडला जाईल. काँग्रेसचे मोहम्मद जावेद, के सुरेश आणि मल्लू रवी हे तीन सदस्य हा प्रस्ताव मांडतील.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी, भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम लढत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होत आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या एका षटकात बिनबाद ७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे, तर उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील. मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//